आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
२७ सप्टेंबर २०२५ - शनिवार

**ठळक बातम्या**

- 4G मोबाईल सेवेसाठी राज्यात ९ हजार २० टॉवर उभारण्यात येणार

- वन्यप्राण्यांची शांतता भंग न करता जंगलांचा अधिक भाग पर्यटकांसाठी खुला केला तर स्थानिक आदिवासींच्या विकासाला अधिक चालना मिळेल असं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचं प्रतिपादन

- अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्यांना सरकार सर्वोतोपरी मदत करेल, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं आश्वासन; तर शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करण्याची विरोधी पक्षांची मागणी

**आणि**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या आकाशवाणीच्या ‘मन की बात’ कार्यक्रमातून देशवासियांना संबोधित करणार

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज दूरसंचार क्षेत्रात स्वदेशी तंत्रज्ञानाच्या आणि सुमारे ३७ हजार कोटी रुपये खर्चाच्या ९७ हजार ५०० पेक्षा जास्त मोबाईल 4G टॉवर्सचं उद्घाटन दूरस्थ पद्धतीनं केलं. या कार्यक्रमाचं थेट प्रक्षेपण पुण्यात करण्यात आलं, यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. 4Gच्या माध्यमातून गावागावांपर्यंत संपर्क व्यवस्था उभी राहत आहे, याद्वारे नागरिकांसाठी आवश्यक सेवा येत्या दोन महिन्यात सुरू करणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. देशभरात ९२ हजारपेक्षा जास्त टॉवर उभारण्यात येणार असून त्यातले ९ हजार २० टॉवर महाराष्ट्रात आहेत, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. या क्षेत्रात भारतानं आपलं सामर्थ्य दाखवून दिल्याचं ते म्हणाले.

- **- होल्ड... बाईट मुख्यमंत्री - -**

**<><><><><>**

मनमाड इंदूर रेल्वे मार्गाला १८ हजार कोटींचा निधी, अक्कलपाडा धरणासाठी आवश्यक भूसंपादनाला तत्वतः मान्यता, नंदुरबार जिल्ह्यासाठी १५ हजार कोटींची

गुंतवणूक तसंच नाशिक-धुळे असा संरक्षण कॉरिडॉर या निर्णयांनी उत्तर महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाला चालना मिळाली आहे,  असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केलं. धुळ्यात आयोजित दिवंगत रोहिदास पाटील यांच्या अभिवादन सोहळ्यात ते बोलत होते.  यावेळी मुख्यमंत्र्यांनी पद्मश्री डॉक्टर प्रकाश आमटे यांना रोहिदास पाटील जनसेवा पुरस्कार देऊन  त्यांचा गौरव केला.

**<><><><>**

वन्यप्राण्यांची शांतता भंग न करता जंगलांचा अधिक भाग पर्यटकांसाठी खुला केला तर स्थानिक आदिवासींच्या विकासाला चालना मिळेल, असं मत केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केलं आहे. नवी दिल्ली इथं आयोजित वन्यजीवनाबद्दलच्या छायाचित्र प्रदर्शनाचं उदघाटन करताना ते आज बोलत होते. सध्या देशातल्या जंगलांमधला फक्त २० टक्के भागच पर्यटकांसाठी खुला असून ८० टक्के भागात पर्यटकांना प्रवेश नसल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. राजस्थान आणि महाराष्ट्रातल्या पर्यटनस्थळांचा विकास झाल्यामुळे स्थानिक आदिवासी तरुणांना रोजगार मिळाल्याचं त्यांनी नमूद केलं. नागपूर ते जबलपूर महामार्गावर वाघांच्या संरक्षणासाठी विशेष मार्गिका तयार केल्या असून त्यामुळे रस्त्यावरच्या वाहतुकीसोबतच वन्यप्राण्यांच्या हालचालींनाही कोणताही अडथळा येत नाही असं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

आज जागतिक पर्यटन दिन आहे. सांस्कृतिक देवाणघेवाण आणि आर्थिक विकासात पर्यटनाचं महत्त्व समजावं म्हणून हा दिवस साजरा केला जातो. ‘पर्यटन आणि शाश्वत बदल’ ही यंदाची संकल्पना आहे. संयुक्त राष्ट्रांच्या जागतिक पर्यटन संघटनेच्या कायद्यांनुसार पहिल्यांदा १९८० मध्ये पर्यटन दिवस साजरा करण्यात आला. जून २०२५ पर्यंत, भारतात येणाऱ्या पर्यटकांची संख्या १ कोटी ६४ लाख होती, तर परदेशात जाणाऱ्या पर्यटकांची संख्या ८ कोटी ४४ लाख नोंदवली गेली.

**<><><><>**

सेवा आणि सुशासन या मार्गदर्शक तत्वांनुसार वाटचाल करत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकार सतत कार्यरत आहे. सेवा पर्व या मालिकेत आज आपण स्मरण करणार आहोत देशाच्या अजरामर वारसा आणि आदर्शांचं....

**- -होल्ड- व्हॉईस कास्ट - -**

*(थोर स्वातंत्र्य सेनानी, तत्वचिंतक आणि परंपरेच्या रक्षकांनी केलेल्या बलिदान आणि योगदानातून राष्ट्राची उभारणी होते. अशा थोर व्यक्तिमत्वांच्या सन्मानासाठी केंद्र सरकारने अनेक पावलं उचलली. त्यांच्या इतिहासाशी संबंधित अनेक वास्तूंचा जीर्णोद्धार झाला. तर अनेक नवीन वास्तू बांधण्यात आल्या. नवीन संसद भवनाच्या उद्घाटन प्रसंगी प्रधानमंत्र्यांनी या प्रतीकांचं महत्त्व समजावून सांगितलं….*

***- - - होल्ड- बाईट- प्रधानमंत्री - -***

*दिल्लीतलं युद्ध स्मारक, अमृतसरच्या जालियनवाला बागेतलं स्मारक, तीनमूर्ती भवनात सुरु केलेलं प्रधानमंत्री संग्रहालय यांचा त्यात समावेश आहे. राष्ट्रीय पोलीस स्मारक, आदिवासी स्वातंत्र्यलढ्यातल्या सेनानींचं संग्रहालय या वास्तू त्यात्या क्षेत्रातला इतिहास सांगतात.)*

**<><><><><>**

वस्तू आणि सेवा कररचनेतले बदल गेल्या सोमवारपासून लागू झाले आहेत, हा बचत उत्सव असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशाला संबोधित करताना सांगितलं. या करसुधारणांमुळे सर्वसामान्य नागरिकांवरचा अप्रत्यक्ष करांचा बोजा कमी होणार आहे.ऐकूया आरोग्य क्षेत्रात या बदलांच्या परिणामाबद्दल....

**- - -व्हॉईस कास्ट- - -**

*(जीएसटीतल्या बदलांमुळे आरोग्यासाठी आवश्यक अनेक वस्तू आणि सेवांवरचे कर कमी झाले आहेत. व्यायामशाळा आणि फिटनेस सेंटर्सवरचा कर आता १८ टक्क्यांवरुन ५ टक्के झाला आहे. त्यामुळे तंदुरुस्त राहण्यासाठी प्रयत्न करणं सर्वसामान्यांच्या आवाक्यात आलं आहे. या खेरीज दूध आणि दुधाचे पदार्थ, सुकामेवा आणि उतर पौष्टिक खाद्यपदार्थांवरचा कर शून्य किंवा ५ टक्के झाला आहे. आरोग्याच्या देखभालीसाठी स्वदेशी उत्पादनंच वापरावी असं आवाहन प्रधानमंत्र्यांनी नुकतच केलं होतं.)*

**<><><><><>**

काँग्रेसनं २९ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान संविधान सत्याग्रह पदयात्रेचं आयोजन केलं आहे. या पदयात्रेची सुरुवात नागपूरच्या दीक्षाभूमीपासून होईल आणि समारोप सेवाग्राम आश्रमामध्ये होणार आहे. महात्मा गांधी जयंती, दसरा तसंच राष्ट्रीय स्वयंसेवक

संघाचा शतकपूर्ती दिन याचं औचित्य साधून युवक काँग्रेस, २ ऑक्टोबरला रेशीमबागेत संघाच्या मुख्यालयात जाऊन देशाचं संविधान भेट देणार आहे.

दरम्यान, काँग्रेसतर्फे उद्या संध्याकाळी ५ वाजता नागपूरच्या व्हरायटी चौकापासून संविधान चौकापर्यंत मशाल यात्रा निघणार आहे. संविधान चौकातील जाहीर सभेने या यात्रेची सांगता होईल, अशी माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीने दिली आहे.

<><><><><>

राज्यातल्या पूरस्थितीमुळे उद्ध्वस्त झालेले संसार पुन्हा उभे करण्यासाठी सरकार सर्वोतोपरी प्रयत्न करेल, असं आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिलं. त्यांनी आज नांदेड जिल्ह्यात कंधार तालुक्यात मणार धरण परिसरातल्या बहाद्दरपुरा, शेकापूर, घोडज पूरबाधित नागरिकांशी व्हिडिओ कॉलद्वारे संवाद साधला. नांदेड जिल्ह्यात नेमक्या कोणत्या भागांत नागरिक अडकले आहेत, त्यांच्या सुटकेसाठी हेलिकॉप्टर किंवा आर्मीची मदत घेण्याची आवश्यकता आहे का? एनडीआरएफचं पथक तातडीने पाठवावं  लागेल का, याबाबत पवार यांनी माहिती घेतली. या संकट काळात सरकार तुमच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. प्रशासनाला आवश्यक त्या सर्व सूचना दिल्या जातील. पूरग्रस्त आणि आपत्तीग्रस्तांना तातडीने मदत पोहोचवली जाईल, अशा शब्दांत पवार यांनी पूरग्रस्तांना दिलासा दिला.

<><><><><>

सोलापूर जिल्ह्यात नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे सप्टेंबर महिन्यातले पंचनामे महिन्याअखेरपर्यंत पूर्ण करून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यात येईल, असं कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितलं आहे. ते आज जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या भागाची पाहणी केल्यानंतर बोलत होते. ऑगस्ट महिन्यातील पंचनामे पूर्ण होऊन ५९ कोटी ७९ लाख रुपयांचा मदत निधी जाहीर केल्याची माहिती त्यांनी दिली.

<><><><><>

राज्यात अतिवृष्टीमुळे प्रचंड नुकसान होऊनही सरकार त्याकडे गांभीर्याने पाहत नाही अशी टीका काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्निथला यांनी केली आहे. काँग्रेसच्या पश्चिम महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांची बैठक आज पुण्यात झाली, त्यानंतर  ते वार्ताहरांशी बोलत होते. शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याची आता गरज आहे, शेतकऱ्यांनी प्रति हेक्टर ५० हजार रुपये देणं गरजेचं आहे, मात्र सरकारनं अजूनही मदत केली नाही असं चेन्निथला म्हणाले.

अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना राज्य सरकारनं सरसकट कर्जमाफी द्यावी आणि हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत द्यावी अशी मागणी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली आहे. मुंबईत आज ते वार्ताहर परिषदेत बोलत होते.

**<><><><>**

बीड जिल्ह्यात संपूर्ण कर्जमाफी करून ओला दुष्काळ जाहीर करत सरसकट पीक विमा देण्याचे आदेश सरकारने द्यावेत, अशी मागणी शेतकरी नेते अजित नवले यांनी केली आहे. ते आज बीड जिल्ह्यात विविध तालुक्यात नुकसानीची पाहणी केल्यानंतर वार्ताहर परिषदेत बोलत होते. इथं अतिवृष्टी, गारपीट, अवकाळी, कोरडा दुष्काळ या सर्व परिस्थितीत निसर्गाशी दोन हात करत सत्ताधाऱ्यांच्या शेतकरी विरोधी धोरणांचा सामना देखील इथल्या शेतकऱ्यांना करावा लागतो असं ते म्हणाले.

**<><><><>**

राज्यात काल संध्याकाळपासून पावसाने पुन्हा जोर धरला आहे. अनेक ठिकाणी नद्यांचे प्रवाह फुगले असून धरणातल्या जलाशयांमधून विसर्ग करण्यात येत आहे. आवश्यकतेनुसार नागरिकांचं स्थलांतर करण्यात येत आहे. त्याच्या बातम्या आमच्या ठिकठिकाणच्या वार्ताहरांनी दिल्या आहेत.

**राजधानी** मुंबई आणि परिसरात पावसाच्या जोरदार सरी अधूनमधून येत आहेत. अनेक ठिकाणी सखल भागात पाणी साचल्यानं वाहतुकीला अडथळे येत आहेत.

**लातूर**, **सोलापूर**, **अहिल्यानगर**, **धाराशिव** जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे.

**हिंगोली** जिल्ह्यात मध्यरात्रीपासून ढगफुटी सदृश पाऊस सुरु असून जनजीवन विस्कळीत झालं आहे. अनेक गावांमध्ये पाणी शिरल्यानं गावांचा संपर्क तुटला आहे.

**गडचिरोली** शहरासह जिल्ह्याच्या काही भागात आज अधूनमधून पावसाच्या हलक्या सरी कोसळल्या. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झालं. मागील चोवीस तासांत कोरची आणि धानोरा तालुक्यात सर्वाधिक पावसाची नोंद झाली.

**बीड** जिल्ह्यात जोरदार पावसानं बिंदुसरा नदीला पूर आला असून शहरातला जुना दगडी पूल पाण्याखाली गेला आहे.

**परभणी** जिल्ह्याला रेड अलर्ट देण्यात आला आहे. जिल्ह्यात पूर परिस्थिती कायम असून पूर्णा तालुक्यातील चुडावा गावाला पाण्याचा वेढा पडला आहे.

**कोल्हापुरात** पावसाचा जोर वाढला आहे. मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे.

**सातारा** जिल्ह्यात पावसाचा जोर वाढला असून संततधार पावसामुळे धरणातल्या पाणीपातळीत मोठी वाढ होत आहे.

**सांगली** जिल्ह्यात काल दुपारपासून  मुसळधार पाऊस पडत आहे. जिल्ह्यात अनेक भागात शेती जलमय झाली असून सोयाबीन, उडीद आणि भुईमूग पिकाबरोबरच डाळिंब, पेरू आणि केळी या फळ पिकांचं नुकसान होत आहे. पालेभाज्यांचंही नुकसान झालं आहे

**नांदेड** जिल्ह्याला पुन्हा एकदा पुराचा मोठा फटका बसला आहे. नांदेड- हैदराबाद राज्य महामार्गासह प्रमुख रस्त्यावरची वाहतूक थांबली असून अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. नांदेड शहरात अनेक भागांमध्ये पाणी शिरलं आहे. नांदेडच्या विष्णुपुरी प्रकल्पात १ लाख ६० हजार क्युसेक  पाण्याची आवक सुरू आहे.

**वाशीममध्ये** चार दिवसाच्या विश्रांतीनंतर पुन्हा एकदा मुसळधार पाऊस सुरु आहे. सोयाबीन, कपाशी, तूर, उडीद, मूग यासह हळद पिकाला सुद्धा या पावसाच्या पाण्याचा मोठा फटका बसला आहे.

**वर्धा** जिल्ह्यात वीज पडून दोन व्यक्तींचा मृत्यू झाला तर एक व्यक्ती जखमी झाली आहे. नांदेड जिल्ह्यात वीज पडून एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे.

**रायगड** जिल्हा आणि पुणे घाट परिसरात उद्यासाठी रेड अलर्ट तर **पालघर**, **ठाणे**, **मुंबई शहर, मुंबई उपनगर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक** आणि **छत्रपती संभाजीनगर** या जिल्ह्यांसह  सातारा घाट आणि कोल्हापूर घाट परिसरात ऑरेंज अलर्ट देण्यात आल्याचं राज्य आपत्कालीन कार्य केंद्रानं कळवलं आहे.

**हवामान** विभागाच्या वैज्ञानिक सुषमा नायर यांनी आकाशवाणीला सांगितलं.

**- - होल्ड - बाईट- - -**

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या आकाशवाणीच्या मन की बात कार्यक्रमातून देशोदेशीच्या श्रोत्यांना संबोधित करतील. हा या कार्यक्रमाचा १२६ वा भाग असेल.

आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
२७ सप्टेंबर २०२५ - शनिवार

**<><><><><>**

माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या अंतर्गत असलेल्या राष्ट्रीय चित्रपट विभाग महामंडळाची सहनिर्मिती असणारा, इंडो-स्वीस संयुक्त निर्मिती ‘तारा अँड आकाश’ हा चित्रपट काल प्रदर्शित झाला. हा चित्रपट टोरांटो आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव, भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव या महोत्सवात दाखवला गेला आहे. मुंबईत या चित्रपटाचे बावीस शो आयोजित केले आहेत.

**<><><><><>**

सी बी आय अर्थात केंद्रीय अन्वेषण विभागानं नवी मुंबईच्या स्फोटकं, पेट्रोलियम आणि स्फोटकं सुरक्षा संघटनेच्या प्रमुखासह नियंत्रकाला आणि एका व्यक्तीला आज लाचखोरी प्रकरणात अटक केली. खासगी सल्लागार आणि एजंट्सच्या मदतीनं मोठ्या प्रमाणावर लाचखोरी केल्याच्या आरोपाखाली सापळा रचून त्याला अटक करण्यात आली.

**<><><><><>**

दक्षिण कोरियात ग्वान्गजु इथं झालेल्या दिव्यांगांसाठीच्या तिरंदाजी अजिंक्यपद स्पर्धेत भारताने ७ पदकं जिंकली. त्यात ३ सुवर्ण, १ रजत आणि ३ कांस्य पदकांचा समावेश आहे. या स्पर्धेत भारताच्या शीतल देवीने जागतिक स्तरावर सुवर्णपदक मिळवणारी जगातली पहिली महिला हस्तविहीन तिरंदाज म्हणून इतिहास घडवला आहे.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसांत कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी पाऊस तर तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**